कार्यालयीन आदेश क्र. १८१८

पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.
दिनांक : १४/१०/२०२४.

विषय : परिवहन महामंडळाचे वाहतूक विभागाकडील कंडक्टर पदाच्या शेडयुल मान्य रिक्त जागांवर बदली कंडक्टरकर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या करणेबाबत.

संदर्भ : १) मा. संचालक मंडळ ठराव क्र. ९९, दि. ०८/०५/२००८.
२) विभागीय बढती समितीचा दि. ०४/१०/२०२४ रोजीचा अहवाल.
३) मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांची दि.१०/१०/२०२४ रोजीची मान्यता.

परिवहन महामंडळाकडील संदर्भ १ चे मा. संचालक मंडळ ठरावानुसार बदली कर्मचाऱ्यांच्या शेडयुलमान्य रिक्त जागांवर नियुक्त्या करण्यास मान्यता दिलेली आहे. तसेच कार्यालयीन आदेश क्र. १५९७, १५९८, १५९९, दि. १८/०९/२०२४ मधून जात पडताळणी नसल्याचे कारणास्तव वगळण्यात आलेले कंडक्टर, ड्रायव्हर कर्मचाऱ्यांमधून पात्र कर्मचाऱ्यांना शेडयुलमान्य रिक्त जागांवर नियुक्त्या करण्यास संदर्भ क्र. २ व ३ ने मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी मान्यता दिलेली आहे.

वरील मान्यतेस अनुसरून खालील नमूद केलेल्या बदली कंडक्टर कर्मचाऱ्यांच्या दि. १४/१०/२०२४ ते दि. १३/०४/२०२५ या मुदतीकरीता कंडक्टर या पदाच्या शेडयुल मान्य जागांवर हंगामी नेमणूका करण्यात येत असून त्यांचा मूळ पगार सुधारित वेतन श्रेणी १८०००-५६९०० (एस-५) प्रमाणे त्यांच्या नावा समोर दर्शविल्यानुसार अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | नाव | ब.हं.रो.कंडक्टर क्रमांक | शेडयुल मान्य हंगामी कंडक्टर क्रमांक | मूळ वेतन रूपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री. प्रशांत रमेश शिंदे | ५६१५ | ६५९९ | १८०००/- |
| ०२ | श्रीमती. मनिषा केशव गायकवाड | ५०९८ | ६६०० | १८०००/- |
| ०३ | श्री. बालाजी गंगाधर शेळके | ५१०९ | ६६०१ | १८०००/- |
| ०४ | श्रीमती ज्योती संदीप सरोदे | ५४७९ | ६६०२ | १८०००/- |
| ०५ | श्रीमती स्वाती दिलीप कदम | ५४७३ | ६६०३ | १८०००/- |

वरील कर्मचाऱ्यांच्या शेडयुल मान्य जागांवरील नेमणूक ही खालील अटीस आधिन राहुन करण्यात येत आहेत.

१) वरील कर्मचाऱ्यांचा परिविक्षाधीन (नियुक्ती) कालावधी तूर्तास दि. १४/१०/२०२४ ते दि. १३/०४/२०२५ या ६ महिने कालावधीकरीता राहील. वरील कर्मचाऱ्यांकडून काही गंभीर स्वरूपाचे गैरवर्तन, गैरहजेरी इ. बाबी आढळून आल्यास त्यांना त्यांच्या मूळ बदली पदावर पदावनत करण्यात येईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी.
२) सदर कर्मचाऱ्यांचे नियुक्त कालावधी मधील तपशीलवार अहवाल चिफ ट्रान्सपोर्ट मॅनेजर (ऑपरेशन) यांनी प्रशासन कार्यालयाकडे सादर करावा. सदरचा अहवाल बढती समिती पुढे पुढील योग्य त्या कार्यवाही पूर्ततेकामी प्रशासन विभागाने सादर करण्याचे करावे.
३) सदर आदेशामध्ये प्रशासकीय व कायदेशीर कारणासाठी बदल, दुरूस्ती, फेरफार आणि आदेश रद्द करण्याचे सर्व अधिकार मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी राखून ठेवले आहेत.
४) वरील कर्मचाऱ्यांपैकी ज्यांची न्यायालयीन प्रकरणे प्रलंबित असतील अशा कर्मचाऱ्यांबाबत मे. न्यायालयाचे आदेश होतील ते बंधनकारक राहतील.

५) वरील कर्मचाऱ्याने त्यांच्या पदाचे प्रत्यक्ष कामकाज करावयाचे असून त्याचा तपशीलवार अहवाल चिफ ट्रान्सपोर्ट मॅनेजर (ऑपरेशन)यांनी प्रशासन कार्यालयाकडे सादर करावयाचा आहे. जे कर्मचारी त्यांच्या हुददयाचे प्रत्यक्ष कामकाज करणार नाही अशा कर्मचाऱ्यांना शेडयूल मान्य जागेवर कायम करणेत येणार नाही, याची नोंद घ्यावी.

६) वरील कर्मचाऱ्यांना महामंडळाचे स्थायी आदेश व सेवानियमातील अटी शर्ती या पुढेही लागू राहतील.

14/10/24

(दिपा मुधोळ-मुंडे, भाप्रसे)
अध्यक्ष व व्यस्थापकीय संचालक
पुणे महानगर परिहवहन महमंडळ लि.

प्रती : आस्थापना,

सहव्यवस्थापकीय संचालक,

मुख्य कार्यकारी अधिकारी,

मुख्य लेखा व वित्त अधिकारी,

कामगार व जनता सपर्क अधिकारी,

मुख्य अंतर्गत अर्थान्विक्षक,

वाहतूक व्यवस्थापक,

मुख्य अभियंता,

स्थापत्य अभियंता,

भांडार विभाग,

विधी अधिकारी,

साख्यंकी विभाग,

सुरक्षा विभाग,

संगणक विभाग,

पगारपत्रक विभाग,

संबंधित रजा लेखनिक.